# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता एच/पूर्व विभाग)

## <u>स्थळ दरपत्रिका</u>

एच/पुर्व विभागातील, प्रभाग क्र. 87 मधील गोळीबारवरील लेन मार्किंग 12 रोड आणि मुन्ना पान शॉप ते देवी माता मंदिर सांताक्रूझ पूर्व पर्यन्त 5 व्या रस्त्याच्या काही भाग.

म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/ पूर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) एच/पूर्व विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. 330/- + 18% टक्के GST कर, इसारा अनामत रक्कम रू. 6000.00/- भरून मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पूर्व' विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

म.न.पा. अधिकृत ठेकेदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. २२.०१.२०२५ रोजी दुपारी 1 वाजे पर्यंत असून, इसारा अनामत रकम दि. २२.०१.२०२५ रोजी संध्याकाळी 4:00 वाजेपर्यंत मनपाच्या नागरी सुविधाकेंद्रामध्ये भरण्यात यावी. म.न.पा. अधिकृत ठेकेदाराने अर्ज दि. २२.०१.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत जमा करावे अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत ठेकेदाराची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. २२.०१.२०२५ रोजी दुपारी 3.00 नंतर अर्ज स्विकारते जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक. २२.०१.२०२५ रोजी दुपारी 4:00 नंतर सहाय्यक अभियंता एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत ठेकेदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडतीकरिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत ठेकेदार राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत ठेकेदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ दरपत्रिका** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्थळ दरपत्रिका** स्विकारली जाणार नाही.

**सहाय्यक अभियंता**
**एच/पूर्व विभाग**